www.rajdand.com
सातारा/पुणे, रविवार
28.01.2024
पृष्ठ : ४ | मुल्य : ४ | पौष कृ ३
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# मराठा आरक्षण आंदोलनाचा विजय

## जरांगे यांनी दिले एकजुटीला श्रेय

**वाशी : मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या वेशीवर जमलेल्या आंदोलकांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या असून आंदोलक नवी मुंबईतून यश पदरात घेऊन माघारी वळणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी या यशाचे श्रेय मराठा समाजाच्या एकजुटीला दिले आहे. अंतरवाली सराटी येथे जाऊन समाजाशी चर्चा करून विजयी सभेचे नियोजन करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.**



कुणबी प्रमाणपत्र असलेल्या मराठा कुटुंबांना इतर मागासवर्ग प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली दीर्घकाळ आंदोलन सुरू आहे. या मागणीबाबत सरकार सुरुवातीपासूनच सकारात्मक होते. मात्र, कुणबी प्रमाणपत्र असलेल्या कुटुंबाच्या सग्या सोयऱ्यांनाही आरक्षणाचा लाभ मिळावा या मागणीवरून कायदेशीर पेच निर्माण झाला होता. राज्य सरकारने अध्यादेश काढून यातून मार्ग काढला आहे.

### आंदोलन थांबले नाही, केवळ स्थगित

आरक्षणाच्या लढ्यात मिळालेला विजय हा मराठा समाजाच्या एकजुटीचा ऐतिहासिक विजय आहे. राज्यकर्त्यांच्या मनात नसले तरीही सर्व बाजूंनी मराठे मुंबईत घुसत आहेत. ते आता थांबणार नाहीत, हे लक्षात आल्यावर आरक्षण मान्य करण्यात आले आहे. या निणर्यामुळे सध्या आंदोलन स्थगित करण्यात आले असले तरीही पुढील काळातही ते सुरू राहील. कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक नोंदी, प्रत्यक्ष प्रमाणपत्र मिळवणे आणि आरक्षणाचा लाभ घेणे या सर्व प्रक्रियेत येणाऱ्या अडीअडचणी दूर करण्यासाठी यापुढेही कार्यरत राहू, अशी ग्वाही जरांगे पाटील यांनी दिली आहे.



## आश्वासन न पाळल्यास पुन्हा आंदोलन

### मनोज जरांगे यांचा इशारा

**नवी मुंबई :** सरकारने अधिसूचनेचा मुसदा काढला आहे, ज्यात कुणबी नोंद मिळाली त्यांच्या सग्या सोयऱ्यांना कुणबी म्हणून प्रमाणपत्र मिळणार आहे. त्याचा अपमान होऊ नये असे आवाहन मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे मनोज जरांगे यांनी सरकारला केले आहे. सरकारने आश्वासन पाळले नाही तर पुन्हा आझाद मैदानात येणार असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मनोज जरांगे यांनी वाशी येथे उपोषण सोडले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी मागण्या मान्य झाल्याचे सांगत शांततेत आंदोलन केल्याबद्दल कौतुक केले. गोरगरीब मराठा समाजाची वेदना मला माहीत आहे. दिलेला शब्द पाळणे हीच माझी कार्यशैली आहे. आज धमवीर आनंद दिघे यांची जयंती तर नुकतीच बाळासाहेब ठाकरे यांची जयंती झाली. दोन्ही माझे गुरू असून त्यांच्या आशीर्वादाने मी हे करू शकलो असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. आम्ही मतांसाठी नाही तर जनतेच्या हितासाठी काम केले आहे असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## मराठा आंदोलकांच्या किती आणि कोणत्या मागण्या मान्य झाल्या?

१. मराठा समाजातील ५४ लाख लोकांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांना जातप्रमाणपत्रांचं वाटप करा, नोंद नेमकी कोणाची हे माहिति करायचं असलं तर ग्रामपंचायतीला नोंदी मिळालेले कागद बाहेरच्या भिंतीवर चिकटवण्यास सांगा. त्यानंतर लोक प्रमाणपत्रं घेण्यासाठी अर्ज करू शकतील. नोंदी मिळाल्या आहेत त्या सर्व कुटुंबांना नोंदींच्या आधारावर प्रमाणपत्र दिलं जावं. ५४ लाख नोंदींनुसार वंशावळी जुळल्यावर त्यांना प्रमाणपत्र मिळायला हवं. ज्याची नोंद मिळाली आहे त्यांनी तातडीने अर्ज भरण्यास सुरुवात करावी. त्यानुसार राज्य सरकारकडे चार दिवसांत प्रमाणपत्र वितरित करण्याची मागणी केली होती. त्यावर राज्य सरकारने म्हटलं आहे की, आतापर्यंत ३७ लाख लोकांना प्रमाणपत्रं दिली आहेत. तसेच वंशावळी जुळवण्यासाठी समिती नेमली आहे.

२. ज्या ३७ लाख लोकांना प्रमाणपत्रं दिली आहेत त्यांची माहिती आम्हाला (मराठा आंदोलक) द्यावी, काही दिवसांत हा डेटा आपल्याला मिळेल.

३. शिंदे समिती रद्द करायची नाही, या समितीने मराठ्यांच्या कुणबी नोंदी शोधत राहावं. त्यानुसार सरकारने दोन महिने मुदत वाढवली आहे. आंदोलकांनी मागणी केली आहे की, ही समिती एक वर्षभर असायला हवी. त्यावर राज्य सरकारने म्हटलं आहे की, टप्प्याटप्प्याने या समितीची मुदत वाढवू.

४. ज्यांची नोंद मिळाली त्याच्या कटुंबांतील सग्यासोयऱ्यांना प्रमामपत्र दिलं जावं. त्याचा शासननिर्णय/अध्यादेश दिला जावा. जो अद्याप सरकारने काढलेला नाही. ज्याची नोंद आहे ती व्यक्ती त्याच्या सग्यासोयऱ्यांबाबत शपथपत्र सादर करत असेल तर त्यांनाही कुणबी प्रमाणपत्र दिलं जावं. तसेच हे शपथपत्र मोफत दिलं जावं. यावर सरकारने होकार दिला आहे. सरकारने यासंबंधीचा अद्यादेश जारी करावा.

५. अंतरवालीसह महाराष्ट्रात ठिकठिकाणी मराठा आंदोलनादरम्यान दाखल केलेले गुन्हे मागे घेतले जावे. त्यावर गृहविभागाने म्हटलं आहे की, विहित प्रक्रिया राबवून गुन्हे मागे घेऊ.

६. सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणासाठी क्युरेटिव्ह पीटिशन दाखल केली आहे. त्यावर निर्णय होईपर्यंत आणि संपूर्ण मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत, मराठा समाजातील मुलांना १०० टक्के शिक्षण मोफत द्यावं, तसेच आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत सरकारी भरत्या थांबवा, अथवा आमच्या जागा राखीव ठेवून भरती करा, अशी मागणी केली होती. परंतु, सरकारने ही मागणी मान्य केलेली नाही. राज्य सरकाने म्हटलं आहे की, राज्यातील केवळ मुलींना केजी टू पीजीपर्यंतचं शिक्षण देण्याचा निर्णय निर्गमित करू. परंतु, यासाठीचा शासननिर्णय जारी केलेला नाही. राज्य सरकारने केवळ मुलींच्या शिक्षणाबाबत अनुकूलता दाखवली आहे. मुलांच्या मोफत शिक्षणाबाबत कुठलाही निर्णय घेतलेला नाही.

## 'सगे सोयरे' हा शब्द म्हणजे आरक्षणाचा सात बारा

कुणबी प्रमाणपत्र असलेल्या मराठा कुटुंबांच्या सग्या सोयऱ्यांनाही आरक्षणाचा लाभ देणे ही सोपी गोष्ट नव्हती. आरक्षणाच्या निणर्यात सगे सोयरे हा शब्द समाविष्ट करणे ही कठीण बाब होती. त्यासाठी राजपत्र काढण्यात आले असून ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते स्वीकारणार आहे. सगे सोयरे हा शब्द म्हणजे आरक्षणाचा सात बाराच आहे, असे जरांगे पाटील यांनी सांगितले.

## '... अन्यथा केंद्र सरकारच्या विरोधात तीव्र आंदोलन करू'

### प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनजी यांनी भरला सज्जड दम

**कोलकाता :** विविध योजनांतर्गत केंद्र सरकारने राज्य सरकारला देणे बाकी असलेली रक्कम एक आठवड्याच्या आत अदा करावी, अन्यथा तृणमूल काँग्रेसच्या वतीने केंद्र सरकारच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा प. बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनजी यांनी केंद्र सरकारला दिला आहे.



पंतप्रधान आवास योजना, मनरेगा, राष्ट्रीय आरोग्य अभियान, स्वच्छ भारत अभियान, पंतप्रधान ग्राम सडक योजना, मध्यान्न भोजन योजना यासह अनेक योजनांच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून राज्य सरकारला तब्बल एक लाख १६ हजार कोटी रुपये येणे असल्याचा ममता बॅनजी यांचा दावा आहे.

केंद्राकडून हा निधी त्वरित दिला जावा यासाठी बॅनजी यांनी २० डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. या भेटीदरम्यान प. बंगाल सरकारचे अधिकारी व केंद्र सरकारचे अधिकारी यांची एकत्र बैठक आयोजित करण्यात येईल व या बैठकीत या निधीची पूतर्ता करण्याबाबत निर्णय करण्यात येईल, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले होते. मात्र, या बैठकीच्या आयोजनाबाबत अद्याप कोणताही निर्णय न झाल्यामुळे बॅनजी यांनी आता केंद्र सरकारला अंतिम इशारा दिला आहे.

## शिवसेना ठाकरे गटाकडून मातृतीर्थ ते शिवतीर्थ मुक्त संवाद अभियान

### तब्बल ८३० किलोमीटर यात्रेत ७० लाख नागरिकांशी साधणार संवाद

**पुणे :** आगामी सार्वत्रिक निवडणूक नजरेसमोर ठेऊन मतदारांशी संवाद साधण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने 'मातृतीर्थ ते शिवतीर्थ मुक्त संवाद अभियाना'ची घोषणा उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली आहे. बुलढाणा ते मुंबई दरम्यान ८३० किमी अंतराच्या या यात्रेत तब्बल ७० लाख मतदारांशी संवाद साधला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.



जनतेच्या भावना जाणून घेण्याबरोबरच सत्ताधाऱ्यांची सूडबुद्धी आणि हुकूमशाही प्रवृत्ती याच्या विरोधात जनमत जागृत करण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा बुलढाणा, सिंदखेड राजा, रीसोल, वाशिम, हिंगोली, परभणी या मार्गाने मुंबईपर्यंत येईल. या यात्रेत लोकसभेचे १३ आणि विधानसभेचे २७ मतदारसंघ समाविष्ट आहेत, अशी माहिती अंधारे यांनी दिली.

या दौऱ्या दरम्यान सहभागी शिवसेना नेते आणि कार्यकर्ते निवास व भोजनासाठी हॉटेल्स, अतिथीगृह याचा वापर करणार नाही तर तंबूमध्ये निवास व्यवस्था केली जाणार आहे. त्याच ठिकाणी सहभागींसाठी भोजनाची व्यवस्था असणार आहे. यात्रेदरम्यान आदित्य ठाकरे, संजय राऊत, भास्कर जाधव यांच्यासह अनेक शिवसेना नेत्यांच्या ठिकठिकाणी सभाही होणार आहेत, असेही अंधारे म्हणाल्या.

ठाकरे गटावर झालेल्या अन्यायाला थेट जनतेसमोरच वाचा फोडण्यासाठी जनता न्यायालयाचे आयोजन करण्यात आले. त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यानंतर सत्ताधाऱ्यांकडून सूडबुद्धीने ठाकरे गटाचे नेते रवींद्र वायकर, किशोरी पेडणेकर यांच्यावर कारवाया करण्यात आल्या, अशी टीका अंधारे यांनी केली. प्रभू श्रीराम हे सर्वांचेच श्रद्धास्थान आहेत. मात्र, त्यातच मश्गूल असलेल्या सत्ताधाऱ्यांकडून महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न मागे पडत आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

## 'गणतंत्र बचाओ'ची हाक; 'ईव्हीएम हटाओ'साठी जनउठाव ९ फेब्रुवारीपासून!

**संविधानकारांनी पसंतीचे लोकप्रतिनिधी, सरकार निवडण्यासाठी आणि अपयशी राज्यकर्त्यांना बदलण्यासाठी मतदानाचा अधिकार देऊन भारतीय जनतेला सामर्थ्यवान बनवले आहे. पण राज्यकर्त्यांनी मात्र ईव्हीएमला मतदानाचा तो अधिकार निष्प्रभ करणारे हत्यार बनवले आहे, असे ईव्हीएम विरोधक संघटनांचे ठाम मत बनले आहे.**

मुंबई : ' ईव्हीएम हटाओ, गणतंत्र बचाओ ' अशी हाक समस्त देशवासीयांना ' ईव्हीएम हटाओ कृती समिती' ने शुक्रवारी प्रजासत्ताक दिनाच्या निमिताने मुंबईतून दिली आहे. इतकेच नव्हे तर, 'मतदान पत्रिका नाही, तर निवडणूक नाही ' असा निर्धार व्यक्त करत या समितीने येत्या ९ फेब्रुवारीपासून मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत धरणेही आयोजित केल्याची घोषणा एका पत्रकाद्वारे केली आहे.

शुक्रवार ९ फेब्रुवारी हा दिवस देशाच्या इतिहासात १९५१ सालात स्वतंत्र भारताच्या सुरू झालेल्या पहिल्या जनगणनेच्या प्रारंभाचा आहे, असे त्या कृती समितीने नमूद केले आहे.

ईव्हीएमविरोधात राज्यभरात निर्णायक जन उठाव घडवण्यासाठी विद्यार्थी आणि युवकांच्या एकजुटीतून ही ' ईव्हीएम हटाओ कृती समिती ' स्थापन झाली आहे. आझाद मैदानात आमचे धरणे आंदोलन सुरू झाल्यानंतर कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या प्रांतांमध्येही जिल्हा - तालुका पातळीवर अखंड आंदोलने सुरू होतील,असे जाहीर करण्यात आले आहे.

९ फेब्रुवारीपासून आझाद मैदानात सुरू होणाऱ्या बेमुदत धरण्याचे नेतृत्व अशोक कांबळे, सुरेश प्र आंभोरे, अमोलकुमार बोधीराज, प्रमोद नाईक, नामदेव साबळे,गजानन शिरसाट, शशांक कांबळे,दीपिका आंग्रे, अविनाश समिंदर, निलेश दुपटे,सचिन साठे हे करणार आहेत. विद्यार्थी, युवक, कामगार, कमर्चारी, महिला यांच्या अनेक संघटना या अखंड आंदोलनात सहभागी होणार आहेत.

या आंदोलनाचे लोण देशातील प्रत्येक राज्यात आणि काना कोपऱ्यात पसरणार असून ईव्हीएम हटवून मतपत्रिका लागू केल्याशिवाय हा एल्गार आता मुळीच थांबणार नाही, असा निर्धार कृती समितीला पाठिंबा दिलेल्या अनेक संघटनांनी एका संयुक्त बैठकीत काल गुरुवारी व्यक्त केला.

संविधानकारांनी पसंतीचे लोकप्रतिनिधी, सरकार निवडण्यासाठी आणि अपयशी राज्यकर्त्यांना बदलण्यासाठी मतदानाचा अधिकार देऊन भारतीय जनतेला सामर्थ्यवान बनवले आहे. मात्र राज्यकर्त्यांनी ईव्हीएमला मतदानाचा तो अधिकार निष्प्रभ करणारे हत्यार बनवले आहे, असे ईव्हीएम विरोधक संघटनांचे मत बनले आहे.

### ईव्हीएम नव्हे, जेसिबी मशीन!

ईव्हीएम म्हणजे साधे मतदान यंत्र नसून जनतेतील असंतोष आणि सरकारविरोधी जनमत उखडून फेकणारे जेसीबी मशीनच आहे, असा स्पष्ट आरोप ईव्हीएम हटाओ कृती समितीने आज प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकात केला आहे. सरकारबद्दल तीव्र नाराजी, अप्रियतेची भावना सर्व थरांतून व्यक्त होत असताना सत्ताधारी पक्षाला पाशवी, विक्रमी बहुमत मिळण्याचा चमत्कार लोकशाहीत फक्त आणि फक्त ईव्हीएमच घडवू शकते!, असे समितीचे म्हणणे आहे.

### ईव्हीएमचा अट्टाहास कशासाठी?

जगातील १९४ राष्ट्रांपैकी १२० देशांमध्ये निवडणुका मतदान पत्रिकेद्वारेच पार पडत आहे. तसेच इंग्लंड, फ्रान्स, इटाली, जमर्नी, आयर्लंड, नेदरलँड, कॅलिफोनिर्या या देशांनी ईव्हीएम पद्धती बंद करून मतदान पत्रिकेचा स्वीकार केलेला आहे. मग भारतामध्येच ईव्हीएम पद्धतीला बिलगून बसण्याचा अट्टाहास कशासाठी, या प्रश्नाचे उत्तर देण्याचे केंद्र सरकार का टाळत आले आहे? असा सवाल त्या कृती समितीने केला आहे.

कुणाला विजयी करायचे,कुणाला पराभूत करायचे आणि पोटनिवडणुका तसेच छोट्या राज्यांत विजय विरोधकांच्या झोळीत टाकण्याचे 'व्यवस्थापन' सत्ताधारी पक्षाला ईव्हीएमद्वारे शक्य होते. तर, दुसरीकडे त्यातून विरोधी पक्षांच्या ईव्हीएम विरोधाची धार बोथट करण्यात राज्यकर्ते यशस्वी होत आहेत, असे निरीक्षण कृती समितीने आपल्या पत्रकात नोंदवले आहे.

### व्हिव्हीपिटी स्लिपा का मोजायच्या नाही?

ईव्हीएमद्वारे केल्या जाणाऱ्या मतदानाबाबतचा संशय दूर करण्यासाठी व्हीव्हीपिटी स्लिप मिळण्याची व्यवस्था करण्यात आली खरी. पण निवडणूक निकाल वादग्रस्त ठरल्यास त्या स्लीपांची मोजणी करण्यास निवडणूक आयोग देत असलेला नकार कोणत्या लॉजीकमध्ये बसतो? त्या नकारामुळे तर जनतेच्या मनात ईव्हीएमबद्दलचा संशय वाढून अधिकच घट्ट झाला आहे, असे कृती समितीच्या पत्रकात म्हटले आहे.

## महायुती सरकारकडून विश्वासघात: ओबीसी संघर्ष समितीचा आरोप

### मराठा आरक्षणाच्या अध्यादेशाविरोधात पुकारणार न्यायालयीन आणि रस्त्यावरचा लढा

**पुणे :** मराठा समाजाला आरक्षण देताना इतर मागासवगीयांच्या आरक्षणाला धक्का लावणार नाही, अशी वारंवार ग्वाही देणारे शिंदे, फडणवीस, पवार सरकारने अर्ध्या रात्रीत अध्यादेश काढून मराठा समाजाला इतर मागासवर्ग प्रवर्गातून आरक्षण देऊन इतर मागासवगीयांचा विश्वासघात केला आहे असा आरोप, ओबीसी संघर्ष समितीने केला आहे. या 'काळया' अध्यादेशाच्या विरोधात न्यायालयीन मार्गाने आणि रस्त्यावर उतरून तीव्र लढा दिला जाईल, असा इशाराही संघर्ष समितीने दिला आहे.



राज्य सरकारने कुणबी प्रमाणपत्र असलेल्या मराठ्यांना इतर मागासवर्ग प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी काढलेल्या अध्यादेशाच्या पाश्वर्भूमीवर ओबीसी संघर्ष समिती आणि राज्यातील ओबीसी नेते यांची उद्या (रविवारी) महत्त्वपूर्ण बैठक होणार असून या बैठकीत आगामी संघर्षाची दिशा ठरवण्यात येईल, असे समितीच्या वतीने सांगण्यात आले. विशेषतः अध्यादेशाचा कायदेशीर दृष्टीने सखोल अभ्यास करून त्याला न्यायालयात आव्हान कसे देता येईल, त्याचबरोबर रस्त्यावरच्या लढाईचीच भाषा समजणाऱ्या या सरकारला रस्त्यावर उतरून कसे आव्हान देता येईल, असा विचार या बैठकीत करण्यात येणार आहे, असे ओबीसी नेत्यांनी सांगितले

महायुती सरकारने मराठा लढ्याच्या सुरुवातीपासून ओबीसी आरक्षणाला धक्का न लावण्याचे आश्वासन दिले होते. त्यावर आम्ही विश्वास ठेवला. मराठा समाजाला आरक्षण देण्यास आमचा विरोध नाही. मात्र, ओबीसी आरक्षणाच्या एका भाकरीत आत्ताच आम्ही ४०० वाटेकरी असताना त्यात मराठा समाजाची भर नको. त्यांना स्वतंत्र आरक्षणाच्या माध्यमातून ५६ भोग दिले तरी आपली हरकत नाही, अशी ओबीसींची भूमिका होती. मात्र, सरकारने ऐनवेळी ओबीसी समाजाला धोका दिला असून त्याची फळे त्यांना भोगावी लागतील, असा इशारा संघर्ष समितीने दिला आहे.

### जरांगे पाटील यांच्यापुढे शिंदे खरंच झाले मिंधे ?

ओबीसी समाजाला वारंवार आश्वासने देऊनही मनोज जरांगे पाटील यांच्या रस्त्यावर उतरलेल्या संख्याबळाच्या दबावाला बळी पडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे खरोखर मिंधे झाले आहेत का, असा सवाल ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आला. शिंदे यांनी इतर मंत्र्यांना विश्वासात घेऊन मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेतला असेल तर त्यांच्या मंत्रिमंडळातील सर्वच पक्ष आणि मंत्र्यांना आगामी निवडणुकांमध्ये ओबीसी समाज त्यांची जागा दाखवून देईल. मंत्र्यांना विश्वासात न घेता हा निर्णय घेण्यात आला असेल तर शिंदे यांनी ओबीसी समाजाप्रमाणेच आपल्या मंत्रिमंडळाचा ही विश्वासघात केला आहे, असा आरोपही यावेळी करण्यात आला. मंत्री छगन भुजबळ हे ओबीसी समाजाचे एकमेव लढाऊ नेते आहेत. त्यांनी सुरुवातीपासून ओबीसी आरक्षण अबाधित राहावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले असून यापुढेही त्यांचा लढा सुरू राहील, असा विश्वासही ओबीसी नेत्यांनी व्यक्त केला.



# सरसकट आरक्षण नाही!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण

**प्रतिनिधी/मुंबई** : मराठ्यांना सरसकट आरक्षण दिले जाणार नाही. ज्या मराठ्यांच्या कुणबी नोंदी सापडलेल्या आहेत, त्यांनाच आरक्षण दिले जाणार आहे. त्यांच्या रक्तातील नात्यातल्या लोकांनाही त्या आरक्षणाचा आणि नोंदींचा लाभ घेता येईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी स्पष्ट केले.

मनोज जरांगे-पाटील यांनी आंदोलन मागे घेतल्यानंतर बोलताना फडणवीस म्हणाले, ''मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर शिंदेंच्या नेतृत्वात तोडगा काढण्यात आला. या निर्णयाचा मला अत्यंत आनंद आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा सुटला असून अत्यंत चांगला मार्ग काढल्याने या आंदोलनाची सांगता झाली आहे. कायद्याच्या चौकटीत राहून जे आरक्षण मिळू शकते, त्याच आरक्षणाची मागणी मनोज जरांगे यांच्याकडून करण्यात आली. सरकारने काढलेला अध्यादेश मनोज जरांगेंनी स्वीकारल्याने त्यांचेही अभिनंदन करतो. या मार्गातून अडचणी कमी होतील, असेही फडणवीस म्हणाले.

### गुन्हे मागे घेणार, पण...

''अंतरवाली सराटीत झालेल्या पोलिसांवरील हल्ल्यापासून ते महाराष्ट्रातील मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले जाणार आहेत. मात्र, ज्या लोकांनी सरकारी बसेस जाळल्या आहेत, ज्यांनी लोकांची घरे पेटवली, पोलिसांना मारहाण केली, अशा लोकांवरील गुन्हे मागे घेतले जाणार नाहीत, तर असे गुन्हे हे केवळ कोर्टाच्या आदेशानुसारच मागे घेतले जातील, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### ओबीसींवर कुठलाही अन्याय नाही

छगन भुजबळ यांनी सरकारच्या मराठा आरक्षणाच्या अधिसूचनेवर आक्षेप घेतला आहे. यावर फडणवीस म्हणाले, ''आक्षेप ही एक कार्यपद्धती आहे. मात्र, ओबीसींवर अन्याय होईल, असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. मराठा बांधवांना नोंदी नसल्याने आरक्षण मिळण्यात अडचणी येत होत्या. त्यासाठी त्यांना आरक्षण मिळण्याचा रस्ता मोकळा केला. त्यांना आरक्षण मिळण्याची जी कार्यपद्धती क्लिष्ट होती, ती सोपी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, ज्या मराठ्यांकडे नोंदी नाहीत, त्यांना आरक्षण दिले जाणार नाही, असेही देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केले.

# सरकारने नेमके कोणाला फसवले?

## नाना पटोलेंचा सवाल : फडणवीस, अजितदादा दिसलेच नाहीत

**प्रतिनिधी/मुंबई**

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी केलेले आंदोलन संपले आहे, पण यातून अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याची मराठा समाजाची मागणी सरकारने पूर्ण केलेलीच नाही. कोणाच्याही आरक्षणला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची भूमिका होती. सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी मान्य केली असेल तर ओबीसींची फसवणूक केलेली आहे. आरक्षणप्रकरणी सरकारची भूमिका स्पष्ट नसून सरकारने फक्त एक अधिसूचना काढलेली आहे व त्यावर हरकती मागवल्या आहेत. सरकारने आरक्षणासंदर्भात अध्यादेश किंवा शासन निर्णय काढलेला नाही. खोटे बोलून संभ्रम तयार करून मराठा समाजाची फसवणूक करणे योग्य नाही. त्यामुळे सरकारने या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट करावी, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले.



मराठा आरक्षणप्रश्नी नाना पटोले म्हणाले की, मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मोठा लढा दिला. सरकारने मागण्या मान्य कराव्यात यासाठी लाखो समर्थकांसह त्यांना मुंबईला यावे लागले. सरकारचे प्रतिनिधी व जरांगे-पाटील यांच्यात चर्चा होऊन रात्री सरकारने एक अधिसूचना काढली व आपल्या सर्व मागण्या मान्य झाल्याचे जाहीर करत जरांगे-पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उपोषण सोडले. अशी अधिसूचना तर सरकार अगोदरही काढू शकले असते, त्यासाठी एवढ्या मोठ्या आंदोलनाची वाट सरकार पहात होते का? मुख्यमंत्री म्हणतात, मी ऐतिहासिक निर्णय घेतला. पण या संपूर्ण घटनाक्रमात राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार कुठेच दिसले नाहीत. मनोज जरांगे-पाटील यांचे उपोषण सोडवण्यासही दोन उपमुख्यमंत्री का गेले नाहीत? हे आश्चर्यकारक आहे. ओबीसी आरक्षणाला हात लावणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले होते. मग मराठा समाजाच्या ओबीसीतूनच आरक्षण दिले पाहिजे या मागणीचे काय झाले? मराठा समाजाला आरक्षण दिले का? आणि दिले असेल ते कुठून, हे सरकारने स्पष्ट केले पाहिजे. सरकारने मराठा समाजाला फसवले की ओबीसी समाजाला हेच कळत नाही. सगळा संभ्रम निर्माण करून सरकार मराठा आणि ओबीसी समाजात वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

आरक्षणाच्या नावाखाली सरकार फसवाफसवीचे राजकारण करत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी जरांगे-पाटील यांच्या आधीही अनेक आंदोलने झाली. मराठा समाजाने ५८ मोर्चे शांततेत काढले होते. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे ही सर्वांचीच भूमिका आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास असणाऱ्या समाजाला आरक्षण दिले पाहिजे. त्यासाठी जातनिहाय जनगणना करणे व आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवणे हे महत्त्वाचे आहे. आमचे नेते राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली आहे व काँग्रेस पक्षाने सातत्याने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवण्याची मागणी केली आहे. ३० जानेवारीपासून संसदेचे अधिवेशन सुरू होत आहे, या अधिवेशनात मोदी सरकारने यावर निर्णय घ्यावा. म्हणजे मराठा समाजासह इतर समाजाच्या आरक्षणाचे प्रश्न सुटतील, असे नाना पटोले म्हणाले.

# आता आरक्षण कधी मिळणार ते मुख्यमंत्र्यांना विचारा -राज ठाकरे

**प्रतिनिधी/मुंबई**

मनोज जरांगे-पाटील यांचे अभिनंदन. आता फक्त आरक्षण मिळायचे बाकी आहे. ते कधी मिळणार, हे पण एकदा मुख्यमंत्र्यांना विचारा, अशी प्रतिक्रिया मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एक्स या समाजमाध्यमावरून दिली आहे.

मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना अधिसूचनेची प्रत दिली व जरांगे-पाटील यांनी आंदोलन थांबविले. मराठा समाजाने राज्यभरात एकच जल्लोष केला. त्यानंतर राज ठाकरे यांनी एक्सवरून प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे-पाटील यांचे अभिनंदन तर केलेच, पण टोलाही लगावला आहे.



राज ठाकरे आपल्या प्रतिक्रियेत म्हणतात, मनोज जरांगे-पाटील यांचे अभिनंदन. सरकारने तुमच्या सगळ्या मागण्या मान्य केल्या. आता फक्त आरक्षण मिळायचे बाकी आहे. ते कधी मिळणार हे पण एकदा मुख्यमंत्र्यांना विचारा. म्हणजे आपल्या मराठा बांधवांना, भगिनींना ही खरी परिस्थिती समजेल. लोकसभा निवडणुकीआधी पारदर्शकता येईल ही अपेक्षा, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे.

मनोज जरांगे-पाटील यांनी अंतरवाली सराटीतून आपल्या आंदोलनाला सुरुवात केली होती तेव्हा राज ठाकरे यांनी त्यांची भेट घेतली होती. मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला त्यांनी पाठिंबा दर्शविला होता.

# सरकारची अधिसूचना टिकणे कठीण

## घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांना शंका

**पुणे** : मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने काढलेल्या अधिसूचनेवर ओबीसी नेत्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यानंतर घटनातज्ज्ञ ॲड. उल्हास बापट यांनीही या अधिसूचनेवर साशंकता व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोललेला प्रत्येक शब्द लिहून ठेवल्याचे सांगत ओबीसींना धक्का न लावता ५० टक्क्यांवर, कायद्यात बसणारे, कोर्टात टिकणारे आरक्षण देऊ म्हणाले, ही जनतेची दिशाभूल आहे. अशा पद्धतीने सांगू नये, ही लढाई सुप्रीम कोर्टात जाणार असून त्याठिकाणी भवितव्य निश्चित होईल, असे बापट म्हणाले.



बापट यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळाले, हा लोकशाहीचा विजय असल्याचे म्हटले आहे. मात्र, अधिसूचनेच्या माध्यमातून देऊ केलेले हे आरक्षण टिकणार की नाही, हे सर्वोच्च न्यायालयच ठरवेल, असेही त्यांनी नमूद केले. एखादा समाज मागास आहे, हे ठरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राज्य मागासवर्ग आयोगाला ट्रिपल टेस्ट करणं बंधनकारक केले आहे. त्या नियमाची अंमलबजावणी करण्याची गरज असल्याचे उल्हास बापट म्हणाले.

उल्हास बापट म्हणाले, ''मराठा समाज ८० ते ९० टक्के मागास आहे, हे खरं असलं, तरी क्रिमिलेअरची व्याख्या केलेली नाही. आरक्षण दोन प्रकारे देता येते. एक कायदेमंडळ करते आणि दुरुस्ती करून वाढवते, ते २०३० मध्ये होईल. कलम १५ आणि १६ मध्ये नोकऱ्या आणि शिक्षणासंदर्भात तरतूद आहे. आरक्षण ही सुविधा आहे, तो मूलभूत अधिकार नाही, हे समजून घ्यावं लागेल. सध्या ५० टक्क्यांवर आरक्षण देता येत नाही. ते बदलायचं झाल्यास ११ न्यायमूर्तींचे घटनापीठ करून करावं लागेल. मात्र, अशी स्थिती नाही. कोणताही समाज मागास ठरवून आरक्षण देताना ट्रिपल टेस्ट असून मागासवर्गीय आयोग, इम्पिरिकल डेटा आणि ते ५० टक्क्यांवर जाता कामा नये, असा कायदा सांगतो. त्यामुळे दाखल्यातून दिलेलं आरक्षण हे बसतं का बघावं लागेल.''



# लवकरच उच्च न्यायालयात जाणार- गुणरत्न सदावर्ते

**मुंबई** : मराठा समाजाला ईडब्ल्यूएसपासून वंचित करण्यासाठी उभारलेले हे आंदोलन होते. या विरोधात आपण उच्च न्यायालयात लवकरात लवकर जाणार असल्याचे ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी स्पष्ट केले आहे.

ओबीसी आणि खुल्या वर्गातील लोकांना मला एक सांगायचे आहे की तुमच्या संवैधानिक अधिकारांच्या रक्षणासाठी मी आहे. कायदयात व्हॅलिडिटी असते. अशा प्रकारच्या बॅकडोअर एण्ट्रीची कायद्यात तरतूद नाही. सरकार असो वा जरांगे असोत हे कायद्यापेक्षा मोठे नाहीत. ३७ लाख प्रमाणपत्रे वाटण्यात आले सांगतात ३ हजार ७०० प्रमाणपत्रही वाटली जाउ शकत नाहीत. स्टंटबाज आंदोलकांवर जास्त बोलून वेळ घालविण्यासारखे मला वाटत नाही. जरांगे कोणत्या लॉ कॉलेजमध्ये पास झाले कोणत्या कॉलेजमधून पास झाले, असा सवाल सदावर्ते यांनी केला. विनोद पाटील, दत्ताभाऊ पाथ्रीकर यांच्यासारख्यांनी बोलले तर समजू शकतो. पण जरांगे बोलतात तर टीआरपी मिळतो, असा टोलाही त्यांनी लगावला. आजच्या जीआरमध्ये नवीन काहीच नाही. सगेसोयरे हे आधीपासूनच आहे. रक्ताचे नातेवाईक याचा अंतर्भाव आधीपासूनच आहे. काहीच नवीन नाही सगळे जुनेच आहे. ओपनमधील, ओबीसीमधील लोकांनी कोणी चिंता करू नये जागा कमी होउ देणार नाही. जे खुल्या वर्गातील आहेत त्यांच्या अधिकाराच्या जागा शाबूत ठेवणे त्यावर गदा न येऊ देणे, ही माझी जबाबदारी आहे.

# मराठा कुटुंबांकडे जमिनी किती?

## राज्य मागास आयोगाने सरकारकडे मागवली माहिती

**पुणे** : राज्य मागासवर्ग आयोगाने एकीकडे मराठा समाजाचे सामाजिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्यभरातील मराठा समाज, खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण घरोघरी जाऊन सुरू करण्यात आले आहे. हे सर्वेक्षण ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्याचवेळी दुसरीकडे राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य शासनाला पत्र पाठवून मराठा समाजातील नागरिकांच्या जमिनींची माहिती मागविली आहे. मराठा समाजातील कुटुंबाकडे किती जमीन आहे, याबाबतची १९६० ते २०२० या कालावधीतील माहिती आयोगाने सरकारकडे मागवली आहे.

एकूण क्षेत्र हेक्टरमध्ये, शेतकरी संख्या आणि मराठा समाजातील शेतकऱ्यांची संख्या, यांचा समावेश असलेली माहिती मागविली आहे. त्या नमुन्यानुसार ही माहिती महसूल विभागाकडून प्राप्त करून देण्याची विनंती राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य शासनाकडे केलेली आहे. दरम्यान, या पत्राची प्रत राज्यातील सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना देखील पाठविण्यात आलेली आहे.

# अशी आहे मराठा आरक्षणाची अधिसूचना

राज्य सरकारने मनोज जरांगे-पाटील यांच्या मागण्या मान्य करत शुक्रवारी मध्यरात्री मराठा आरक्षणाची अधिसूचना काढली आहे. ती जशीच्या तशी...

सगेसोयरे या वर्गातील नातेवाईक म्हणजे अर्जदाराचे वडील, आजोबा, पणजोबा व त्यापूर्वीच्या पिढ्यांमध्ये जातीमधील झालेल्या लग्न नातेसंबंधातून पूर्वी निर्माण झालेले नातेवाईक, असा असेल. यामध्ये सजातीय विवाहातून जे नातेसंबंध तयार झाले आहेत, त्यांचा समावेश असेल. कुणबी नोंद मिळालेल्या नागरिकांच्या रक्त नात्यातील काका, पुतणे, भाव-भावकीतील, असा नातेवाईक तथा पितृसत्ताक पद्धतीतील सगेसोयरे ते तसे नातेवाईक अथवा सगेसोयरे आहेत, अर्जदाराने असे शपथपत्र पुरावा म्हणून उपलब्ध करून दिल्यास तथा गृहचौकशी करून नोंद मिळालेल्या त्यांच्या रक्ताच्या सग्यासोयऱ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र तपासणी करून तत्काळ देण्यात येईल. मराठा समाजात परंपरेनुसार गणगोतांशी लग्नाच्या सोयरिकी होतात ते सर्व सगेसोयरे, मात्र सगेसोयरे यांचा सर्व साधारणपणे अर्थ पितृसत्ताक पतीचे नातेवाईक असा घेतला जाईल तथा लग्नाच्या ज्या सोयरिकी होतात, त्या गणगोतात आहेत किंवा सजातीय आहेत, याचा पुरावा उपलब्ध करून दिल्यास गृहचौकशी करून त्यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्यात येईल. कुणबी जातीची नोंद मिळालेल्या नागरिकांच्या रक्त नातेसंबंधातील पुरावा आढळल्यास नोंद मिळालेल्या नागरिकांच्या रक्तनाते संबंधातील सदस्यांचे शपथपत्र महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ नुसार घेऊन त्यांनाही तपासून तत्काळ कुणबी जात प्रमाणपत्र देता येतील. सदरची अधिसूचना अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी लागू राहील. सगेसोयरे माहिती उपलब्ध असल्यास, पडताळणी समितीच्या निर्णयाची साक्षांकित प्रत आणि/किंवा अर्जदाराच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांचे किंवा सगेसोयरे यांचे वैधता प्रमाणपत्र सोबत द्यावे.



**निर्णायक लढ्याचे रणशिंग**

**मराठा आरक्षणासाठी निर्णायक लढा देण्यासाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने मराठा बांधव मुंबईच्या वेशीवर आले. आंदोलकांनी शुक्रवारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससमोर ठिय्या मारत रस्ता रोको केला. त्यामुळे या भागातील वाहतूक ठप्प झाली होती.**

(छाया : दीपक साळवी)

# ओबीसी समाज समाधानी

## पण, आमच्याशी धोका झाल्यास रस्त्यावर उतरू -बबन तायवाडे

**प्रतिनिधी/मुंबई**

राज्य सरकारने मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करताना घेतलेल्या निर्णयावर ओबीसी समाज समाधानी आहे. कारण सरकारने आमच्या अस्तित्वाला कुठेही धक्का लावलेला नाही. आमच्यावर कुठलाही अन्याय झालेला नाही, असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबन तायवाडे यांनी स्पष्ट केले. मात्र, सरकार आमच्याशी धोका करतोय हे ज्या दिवशी लक्षात येईल, त्या दिवशी संपूर्ण महाराष्ट्रातून ओबीसी समाज घराघरांतून निघेल आणि आपल्या संविधानाचे, अधिकाराचे रक्षण करेल, असा इशाराही त्यांनी सरकारला दिला आहे.

मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करण्यासाठीची अधिसूचना सरकारने काढली आहे. त्यासंदर्भात बबन तायवाडे यांनी पत्रकारांशी बोलताना आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, वडील, आजोबा आणि पणजोबा यांच्या महसुली आणि शैक्षणिक कागदपत्रांवरील जी जात लिहिली असेल तीच जात पुढे त्यांच्या मुलांना, नातवंडांना लागत असते आणि त्याच्या आधारे ओबीसी असल्याचे प्रमाणपत्र घेता येते. सरकारने काढलेल्या आजच्या जीआरमध्ये तोच शब्दप्रयोग वापरला आहे, त्यामुळे यामध्ये ओबीसींचे कुठेही नुकसान झालेले नाही. लग्नाच्या पूर्वीची आईची जात आणि वडिलांची जात या दोन्ही एकच असतील तर त्याला आपण सहजातीय विवाह म्हणतो. या दोन्ही जाती एकच असतील तर आपल्याला प्रमाणपत्र मिळते. आपल्या जातीचे प्रमाणपत्र काढण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा आपल्याला वडील, काका, आजोबांची कागदपत्रे द्यावी लागातात, आईकडील कागदपत्रे चालत नाहीत, असेही तायवाडे म्हणाले.

राज्य सरकारने २९ सप्टेंबर २०२३ रोजी कुठल्याही परिस्थितीत मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण आणि सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणार नाही, असे लेखी स्वरूपात आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाला सरकारने कुठेही धक्का लावलेला नाही. त्यामुळे ओबीसी समाज हा पूर्णपणे समाधानी आहे. आंदोलनकर्त्यांचे समाधान होणे महत्त्वाचे असते. ते सरकारने केले आहे. त्याच्यातून काय मिळाले आणि काय नाही मिळाले, याचे भविष्यात विश्लेषण होईल. पण आजच्या घडीला त्यांचे समाधान झाले असून सरकार खूश आहे. आमच्या अस्तित्वाला कुठेही धक्का लागला नाही म्हणून आम्ही खूश आहोत. दोन्ही समाजाला सरकारने खूश केले, हा सरकारने सुवर्णमध्य काढला आहे. त्यामुळे आम्ही नाराज होण्याचा प्रश्नच नाही, असे तायवाडे यांनी स्पष्ट केले.

# राज्य सरकारला सत्तेत राहण्याचा अधिकार नाही!

**मुंबई** : राज्य सरकारने मराठा नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. सरकारच्या या निर्णयावर ओबीसी नेते प्रकाश शेंडगे हे संतप्त झाले आहेत.

**ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांची तीव्र प्रतिक्रिया**

ते म्हणाले की, "या सरकारला सत्तेत राहण्याचा अधिकार नाही. त्यामुळे आम्ही येत्या सोमवारी किंवा मंगळवारी राज्यपालांना भेटून त्यांच्याकडे आमचे गाऱ्हाणे मांडणार आहोत. हे सरकार मागसवर्गीयांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात सपशेल अपयशी ठरले आहे. त्यामुळे त्यांना सत्तेतून पायउतार व्हायला लावावे, अशी मागणी राज्यपालांकडे करणार आहोत."

ओबीसी नेते म्हणाले, छगन भुजबळ हे राज्य सरकारमध्ये ओबीसींच्या बाजूने लढत आहेत. परंतु, त्यांना कोणाचीही साथ मिळत नाही. त्यांच्या पक्षातला एकही नेता मनोज जरांगेंच्या विरोधात बोलत नाही. तसेच भाजपा नेतेही शांत आहेत. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेदेखील गप्प बसलेत, फडणवीसही गप्प आहेत. आरक्षणप्रश्नी चर्चा करण्यासाठी आम्ही देवेंद्र फडणवीस यांना भेटण्याची वेळ मागितली होती. परंतु, मागच्या वेळी ते आम्हाला भेटले नाहीत. आता पुन्हा एकदा आम्ही त्यांच्याकडे वेळ मागितली आहे. ओबीसींच्या आरक्षणाबाबत फडणवीस यांनी त्यांची भूमिका स्पष्ट करावी, अशी आमची मागणी आहे.

शेंडगे म्हणाले, आम्हाला ओबीसींचे आरक्षण टिकवण्यासाठी राजकीय लढाई लढावी लागेल. आम्ही रस्त्यावरची लढणारच आहोत. महाराष्ट्रभर आक्रोश आंदोलन करणार आहोत. तसेच मराठा आरक्षणाबाबतच्या सरकारच्या सर्व आदेशांची आम्ही होळी करणार आहोत. यासह आम्ही न्यायालयीन लढाईदेखील लढणार आहोत.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

## आण्णासाहेब मगर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**हडपसर :** हडपसर मधील आण्णासाहेब मगर महाविद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्र ध्वजारोहण कर्नल समीर कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लेखा परीक्षक मच्छिंद्र कामठे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. या प्रसंगी महाविद्यालयातील छात्रसैनिकांनी राष्ट्रध्वजास शानदार मानवंदना दिली तसेच उत्कृष्ट संचलन व प्रात्यक्षिके केली. सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

कर्नल समीर कुलकर्णी यांनी देशाच्या उज्वल भवितव्यासाठी झटणाऱ्या छात्र सेनेच्या कॅडेसचे कौतुक केले. लेखा परीक्षक मच्छिंद्र कामठे यांनी महाविद्यालयाबद्दल कृतज्ञाता व्यक्त करत प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचे, खेळाडूंचे सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी (२०२४) कर्तव्य पथावर (राजपथ) होणाऱ्या संचलनासाठी निवड झालेल्या गोल्डन एसयुओ आबुतराव तांबोळी आणि गोल्डन एसयुओ तुषार अडसूळ या छात्र सैनिकांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयास जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक मिळाल्या बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य व डॉ. नीता कांबळे यांचासत्कार करण्यात आला. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त देण्यात येणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार २०२४ पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या आण्णासाहेब मगर महाविद्यालयाला तसेच उत्कृष्ट राज्यस्तरीय सदिच्छा दूत पुरस्कार २०२४ निकिता सालगुडे या विद्याथिनीला मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शुभांगी औटी, डॉ. प्रशांत मुळे, प्रा. अनिल जगताप, प्रा. विलास शिंदे, कॅप्टन डॉ. धीरजकुमार देशमुख, प्रा. अनिल दाहोत्रे, कार्यालयीन अधीक्षक गणेश साबळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अनिल दाहोत्रे यांनी केले तर आभार डॉ. प्रशांत मुळे यांनी मानले.

# आंबेगाव तालुक्यातील नागापुर येथील पौष पौर्णिमेची यात्रा उत्साहात संपन्न





**वळती / सुनिल भोर**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पुणे जिल्ह्यातील नागापूर (ता. आंबेगाव) येथील श्री क्षेत्र थापलींग खंडोबा देवाची यात्रा गुरुवार(दि. २५) व शुक्रवार(दि २६) दोन दिवस उत्साहात संपन्न झाली. तब्बल दोन ते अडीच लाख भाविकांनी 'सदानंदाचा येळकोट'च्या जयघोषात तळी भंडार करून दर्शन घेतले आहे.

उत्तर पुणे जिल्हयात आंबेगांव तालुक्यात पौष पौणिर्मेला दरवर्षी थापलिंग येथे दोन दिवस खंडोबा देवाची यात्रा भरते. त्यानुसार यंदा गुरुवारी पहाटे पाच वाजता विधीवत देवाची पूजा करण्यात आली . दोन दिवस भरणाऱ्या यात्रेला टोकन पद्धतीने नवसाचे ५५० बैलगाडे पळाले . या यात्रेत बैलगाडा शयर्तींना कोणतेही बक्षीस अथवा इनाम दिला जात नाही . तसेच दुसऱ्या दिवशी शुक्रवारी सकाळी सातपासून गडावर भाविकांची गदी होण्यास सुरुवात झाली होती. दुपारी बारानंतर भाविकांची मोठ्या प्रमाणावर गदी वाढली. या दोन दिवसात सुमारे दोन ते अडीच लाख भाविकांनी गडावर येऊन खंडोबा देवाचे दर्शन घेतले . दुपारी तीन नंतर थापलींग गडाच्या सर्व रस्त्यांवर ट्रॅफीक जॅम झाल्याने भाविकांना बाहेर पडताना मोठी कसरत करावी लागली .

आपल्या कुलदैवताचा कुलाचार जागरण-गोंधळाचा कार्यक्रम , तळी-भंडार करण्यासाठी भाविकभक्त मोठ्या संख्येने गडावर येऊन करताना दिसत होते . तसेच यावषी आठ वर्षे बैलगाडा शयर्तींवर असणारी बंदी उठल्याने बैलगाडा शौकीनांनी शयर्तींचा मनमुराद आनंद घेतला . थापलींग गडावर जिलेबी -भजीची हॉटेल, शेव - रेवडीची दुकाने रसवंती गृहे, आकाशी पाळणे , खेळणेची दुकाने, तसेच शेतीउपयोगी साहित्य अशा अनेक प्रकारच्या व्यावसायिकांची लाखोच्या घरात आर्थिक उलाढाल झाली .

यात्रा उत्सवात कुठलाही अनुचित प्रकार घडु नये यासाठी पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक लहु थाटे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता .

खासदार डॉ.अमोल कोल्हे यांना रस्त्यावर झालेल्या ट्रॅफिकचा फटका बसला . खासदार कोल्हे यांना सव्वा किलोमीटर अंतर रस्त्यावरील गदीतुन पायी चालत थापलिंग देवस्थानकडे जावे लागले . खासदार डॉ . अमोल कोल्हे बैलगाडा घाटात बैलगाडा शौकीनांना संबोधित करताना म्हणाले मी आपला प्रतिनिधी या नात्याने संसदेमध्ये आवाज उठवल्यानंतर बैलगाडा शर्यत पुन्हा चालू झाली, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि ग्रामीण रोजगार हा बैलगाडा शयर्तीवर अवलंबून आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले, बैलगाडा बंदी उठल्यानंतर आज या ठिकाणी प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान दिसून येतंय. पिकाला हमीभाव, कांदा निर्यातबंदी, दूध प्रश्न, बिबट्या प्रश्न असे अनेक विषय संसदेत मांडताना तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला प्रेरणा मिळते.तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष देवदत्त निकम यांची वाढती जबाबदारी पाहता (सर्व जनतेला उद्देशून) जे तुमच्या सर्वांच्या मनात आहे, ती अपेक्षा पूती नक्कीच होईल अश्या शुभेच्छा देताना त्यांनी एकप्रकारे अप्रत्यक्ष रित्या आंबेगाव मधील आमदारकीच्याच शुभेच्छा दिल्याची भावना व्यक्त केली.

या पुढील काळात बैलगाडा शर्यत जागतिक पातळीवर पोहचवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची भावना देखील त्यांनी व्यक्त केली.

यात्रा सुरळीत पार पडण्यासाठी थापलिंग देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष देवदत्त निकम यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच गणेश यादव, डॉ. संजय भोर, गणेश म्हस्के, नामदेव रिठे, डी. एन. पवार, सुनील शिंदे, नवनाथ पोखरकर, बाळासाहेब गाडेकर, ज्ञानेश्वर यादव, सूयर्कांत भागवत, भरत म्हस्के, सचिन निकम आदीनी परिश्रम घेतले.

## हडपसर माळवाडीमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा



**हडपसर :** हडपसर माळवाडी येथे ७५ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले) विधानसभा मतदारसंघ माळवाडी शाखेच्या वतीने व पंचशील मित्र मंडळाच्या वतीने भैरवनाथ चौक या ठिकाणी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्र ध्वज कार्यक्रमांचे आयोजन रिपाइं पुणे शहर उपाध्यक्ष संतोष खरात यांनी केले .याप्रसंगी सुखदेव कांबळे, सोमनाथ लोंढे? विश्वनाथ शिरसाट ,गणेश जाधव, दत्ता पिसाळ, चंदू लोंढे , तुषार बिनविरोध, गणेश. सोनकांबळे, महिला व विद्यार्थी व परिसरातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## आझम कॅम्पस येथे डॉ. दीपक म्हैसेकर यांच्या हस्ते ध्वजवंदन





**पुणे :** प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी (आझम कॅम्पस) येथे निवृत्त विभागीय आयुक्त(पुणे ), मुख्यमंत्र्यांचे माजी सल्लागार डॉ. दीपक म्हैसेकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.संस्थेचे अध्यक्ष तसेच 'डॉ पी ए इनामदार युनिव्हसिटी 'चे कुलपती डॉ.पी.ए.इनामदार हे कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी होते . महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्ष अबेदा इनामदार, सचिव प्रा.इरफान शेख,शाहिदा सय्यद,शाहिद इनामदार,डॉ अरिफ मेमन,डॉ एन वाय काझी,कादिर कुरेशी यांच्यासह विविध संस्थांचे विश्वस्त, पदाधिकारी, प्राध्यापक शिक्षक वर्ग, विद्याथी उपस्थित होते. संचलन,आकर्षक क्रीडा प्रात्यक्षिके, सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. चित्र प्रदशर्नाचे उदघाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

आझम कॅम्पस च्या व्ही. एम. गनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे दि.२६ जानेवारी रोजी सकाळी साडेआठ वाजता हा सोहळा उत्साहात पार पडला.

## आझम कॅम्पस येथे डॉ. दीपक म्हैसेकर यांच्या हस्ते ध्वजवंदन




**पुणे :** प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी (आझम कॅम्पस) येथे निवृत्त विभागीय आयुक्त(पुणे ), मुख्यमंत्र्यांचे माजी सल्लागार डॉ. दीपक म्हैसेकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.संस्थेचे अध्यक्ष तसेच 'डॉ पी ए इनामदार युनिव्हसिटी 'चे कुलपती डॉ.पी.ए.इनामदार हे कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी होते . महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्ष अबेदा इनामदार, सचिव प्रा.इरफान शेख,शाहिदा सय्यद,शाहिद इनामदार,डॉ अरिफ मेमन,डॉ एन वाय काझी,कादिर कुरेशी यांच्यासह विविध संस्थांचे विश्वस्त, पदाधिकारी, प्राध्यापक शिक्षक वर्ग, विद्याथी उपस्थित होते. संचलन,आकर्षक क्रीडा प्रात्यक्षिके, सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.चित्र प्रदशर्नाचे उदघाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

आझम कॅम्पस च्या व्ही. एम. गनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे दि.२६ जानेवारी रोजी सकाळी साडेआठ वाजता हा सोहळा उत्साहात पार पडला.

## पुणे -लोणावळा दरम्यान अनेक गाड्या रद्द राहणार

**पुणे :** मध्य रेल्वेच्या पुणे विभागाद्वारे पुणे-लोणावळा दरम्यान अभियांत्रिकी आणि दुरुस्तीच्या तांत्रिक कामांसाठी रविवारी (ता.२८) मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे पुणे झ लोणावळा दरम्यान अनेक उपनगरी गाड्या रद्द राहतील.

**मेगा ब्लॉकमुळे रद्द होणाऱ्या गाड्या**

१) पुण्याहून लोणावळ्यासाठी सकाळी ९.५७ वाजता सुटणारी लोकल रद्द राहील. २) पुण्याहून लोणावळ्यासाठी सकाळी ११.१७ वाजता सुटणारी लोकल राहील. ३) पुण्याहून लोणावळ्यासाठी दुपारी ३ वाजता सुटणारी लोकल रद्द राहील. ४) शिवाजीनगरहून तळेगावसाठी दुपारी ३.४७ वाजता सुटणारी लोकल रद्द राहील. ५) पुण्याहून लोणावळ्यासाठी सायंकाळी ४.२५ वाजता सुटणारी लोकल रद्द राहील. ६) शिवाजीनगर वरून लोणावळ्यासाठी सायंकाळी ५.२० वाजता सुटणारी लोकल रद्द राहील. ७) लोणावळ्याहून शिवाजीनगरकरीता सकाळी १०.०५ वाजता सुटणारी लोकल रद्द राहील. ८) लोणावळ्याहून पुण्यासाठी दुपारी २.५० वाजता सुटणारी लोकल रद्द राहील. ९) तळेगाव येथून पुण्यासाठी सायंकाळी ४.४० वाजता सुटणारी लोकल रद्द राहील. १०) लोणावळ्याहून शिवाजीनगरकरीता सायंकाळी ५.३० वाजता सुटणारी लोकल रद्द राहील. ११) लोणावळ्याहून शिवाजीनगरसाठी सायंकाळी ६.०८ वाजता सुटणारी लोकल रद्द राहील. १२) लोणावळ्याहून पुण्यासाठी सायंकाळी ७ वाजता सुटणारी लोकल रद्द राहील.

एमजीआर चेन्नई - लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई सुपरफास्ट एक्सप्रेस साडेतीन तास विलंबाने धावणार आहे.

## प्रा. दिलीप कदम यांचे निधन



**हडपसर :** मराठी अथर्शास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता, आण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रा. दिलीप सयाजी कदम यांचे नुकतच वयाच्या ६५ वषी अल्पशा आजाराने निधन झाले. पुरंदर तालुक्यातील दौंडज या खेड्यातून अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले होते. पुणे जिल्हा शिक्षण मंडळात विद्यार्थी, प्राध्यापक, उपप्राचार्य ते अधिष्ठाता असा त्यांचा प्रवास होता. विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांची ख्याती होती. हडपसर येथील साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात ते सक्रीय असायचे. त्याच्या निधनाने या क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. त्याचे विद्यार्थी सहकारी प्राध्यापक, नागरिक हळहळ व्यक्त करत आहेत. त्यांच्या पश्चात त्यांची आई, पत्नी व मुलगा असा परिवार आहे.

## ... आणि वादा रहा सनम, या गाण्यावर झाले माझ्या नावाचे शिक्कामोर्तब

### गायक अभिजीत भट्टाचार्य यांनी इंडियन आयडॉल सीजन १४ मध्ये केला गौप्यस्फोट

**मुंबई :** या शनिवारी, सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील इंडियन आयडॉल १४ या अत्यंत लोकप्रिय गायन रियालिटी शोमध्ये अभिजीत चॅलेंज या खास भागासाठी सुप्रसिद्ध गायक अभिजीत भट्टाचार्यला आमंत्रित करण्यात आले आहे. ९० च्या दशकातील हा लोकप्रिय गायक स्पर्धकांना वेगवेगळी आव्हाने देईल, ज्यातील काही गायकाची क्षमता जोखणारी असतील तर काही गंमतीशीर असतील. सर्व स्पर्धक या चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी जीव ओतून प्रयत्न करताना दिसतील.

ओबोमला एक सूफी गाणे सादर करण्याचे आव्हान मिळेल, तर पियुषला एक गाणे गझलच्या शैलीत सादर करण्याचे आव्हान असेल. वैभवला असे एक गाणे सादर करण्यास सांगितले जाईल, जे कुमार सानू आणि अभिजीतने एकत्र म्हटले होते. अंजनाला ह्यये काली काली आंखें गाणे दिले जाईल, जे तिने त्याच चालीत पण वेगळ्या ठेक्यात म्हणायचे आहे.

कोलकाताहून आलेल्या अनन्या पालने खिलाडी चित्रपटातील वादा रहा सनम आणि दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे चित्रपटातील ह्यजरा सा झूम लूं मैं ही मुळात अभिजीतने गायलेली गाणी सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. कुमार सानू तिला दाद



देताना म्हणाला, तुझा आवाज पाश्वर्गायनासाठी अगदी तयार आहे.

अनन्याच्या गायन शैलीने प्रभावित झालेल्या अभिजीत भट्टाचार्यने वादा रहा सनम गाण्याविषयी सांगितले की, हे गाणे मुळात मी म्हणणार नव्हतो. बालासुब्रमण्यम साब हे गाणं गाणार होते. हे गाणे बालासुब्रमण्यम आणि लता जींनी एकत्र सादर करावे अशी संगीतकार जतिन-ललितची इच्छा होती. पण काही कारणाने ते जुळून येत नव्हते. तालमी होऊ शकत नव्हत्या. त्यामुळे मग बालासुब्रमण्यमसोबत अलका याज्ञिक हे गाणे गाईल असे ठरले. त्यानंतर मला सांगण्यात आले की, मला हे गाणे डब करायचे आहे. चंपक जैन जींची ही युक्ती होती की, मी गाणे डब करायचे आणि मग पुढचे ठरवायचे. शेवटी, हे गाणे माझ्याच आवाजात ठेवण्यात आले.


## ओटीटी प्लॅटफॉर्मवर 'ॲनिमल'च्या चर्चा तर थिएटरमध्ये अनिल कपूरच्या 'फायटर'ची अनोखी कमाई!

मेगास्टार अनिल कपूर यांची स्टार पॉवर सलग दोन महिन्यांत बॅक-टू-बॅक हिट्ससह चमकत असताना आता सिनेमा आयकॉन सध्या OTT आणि थिएटर या दोन्हींवर वर्चस्व गाजवत आहे. १ डिसेंबर २०२३ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झालेला त्यांचा ब्लॉकबस्टर चित्रपट ॲनिमल आता नेटफ्लिक्सवर पाच भारतीय भाषांमध्ये ऑनलाइन उपलब्ध झाला आहे.

सोबतीला अनिल कपूर थिएटर्सवरही वर्चस्व गाजवत आहे आणि ग्रुप कॅप्टन राकेश 'रॉकी' जयसिंग म्हणून त्याच्या नवीनतम चित्रपट 'फाइटर'साठी प्रशंसा मिळवत आहे. ॲनिमलमधील अनिल कपूर ची भूमिका अफलातून झाली आहे आणि त्यांचा अभिनयाचं कौतुक देखील झालं. बलबीर सिंग म्हणून सर्वत्र प्रशंसा मिळवत असून आता फायटर मध्ये प्रेक्षक आणि समीक्षक दोघांनाही भुरळ घालणारी सूक्ष्म अभिव्यक्ती आणि कमांडिंग उपस्थितीने कथा वाढवते.

या कामगिरीमुळे कपूरचा सिनेमा आयकॉन म्हणून दर्जा मजबूत होतो, त्याच्या अष्टपैलुत्वासाठी आणि सखोलतेसाठी साजरा केला जातो. त्याच बरोबर, Netflix वर ॲनिमल प्रवाहित होत असताना, कपूर सिद्धार्थ आनंदच्या 'फाइटर' मधील ग्रुप कॅप्टन राकेश 'रॉकी' जयसिंगच्या त्याच्या ताज्या भूमिकेने थिएटर प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत आहे, पुढे त्याचे चिरस्थायी आकर्षण आणि प्रतिभा दाखवत आहे. फायटर हा सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित आणि आनंदच्या मार्फ्लिक्स पिक्चर्सने निर्मित केलेला एरियल ॲक्शन-थ्रिलर आहे.

हृतिक रोशन, दीपिका पदुकोण, करण सिंग ग्रोव्हर आणि अक्षय ओबेरॉय यांच्यासोबत कपूर स्टार्स २५ जानेवारी २०२४ रोजी रिलीज झाल्यापासून प्रेक्षकांना भुरळ घालत आहेत. अनिल कपूरच्या अपवादात्मक कामगिरीने खरा सिनेमा आयकॉन म्हणून त्याच्या स्थितीची पुष्टी केली!



# बाळासाहेब भिसे यांचे बाजार समिती विरोधात आमरण उपोषण

## निषेध करण्यासाठी आंदोलकाने स्वतःची बांधली तिरडी

**हडपसर :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या अनागोंदी कारभारांची चौकशी व्हावी व खोतीदारांना पुन्हा मांजरी उपबाजारात पूर्ववत व्यवसाय करण्यास परवानगी द्यावी या मागणीसाठी बाळासाहेब भिसे यांनी मार्केटच्या प्रवेश द्वारासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे, न्याय मिळत नाही तोपर्यंत मागे हटणार नाही भिसे यांनी स्वतःची तिरडी बांधून घेत आता मरण किंवा न्याय निर्णय लागेपर्यंत उपोषण चालूच राहणार असे भिसे यांनी संचालक मंडळाला इशारा दिला आहे.

मांजरी उपबाजारातील या आंदोलनाने जनतेचे लक्ष वेधले असून संचालक मंडळाचा गैरकारभार

थांबणार का असा प्रश्न निर्माण झाला.

तीन महिन्यापासून खोतिदारांना मज्जाव केल्याने मजूर नाही, मजूर, महिला , ड्रायव्हर, कामगार यांच्यावर बेकारी ची कुऱ्हाड कोसळली आहे, वारंवार मागणी करूनही संचालक मंडळाने या निणर्याचा फेरविचार केला नाही.

गेल्या तीन महिन्यापासून संचालक मंडळांने मांजरी उपबाजारात खोतिदार व्यापाऱ्यांना मज्जाव केला आहे तसेच पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अनेक ठराव करुन गैरकारभार चालविला आहे, या गैरकारभाराची



राज्य शासनामार्फत चौकशी व्हावी व खोतीदार व्यापाऱ्यांना मांजरी उपबाजारात पुन्हा प्रवेश द्यावा अशी आग्रही भूमिका बाळासाहेब भिसे यांनी या उपोषण प्रसंगी मांडली.

कुपोषण स्थळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, बाजार समिती संचालक गणेश घुले, लोणी काळभोरचे सरपंच योगेश काळभोर, माजी सरपंच सचिन तुपे, रुपाली शिंदे जनरल कामगार अध्यक्षा, श्रद्धा जाधव युवती अध्यक्षा, आण्णा बोडके , पुरुषोत्तम कुंजीर ,हवेली राजकुमार काळभोर, अमृत काळभोर, माऊली माथेफोड, गोरख तुपे , भरत काळभोर, लालुशेठ चावट, संजय चांदणे, मोहन चिंचकर आदिंसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट दिली.

संचालक मंडळांने खोतिदारांवर अन्याय केला आहे , शरद पवार यांच्यामार्फत हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी सांगितले.

संचालक मंडळाने आमच्या खोतिदारांवर अन्याय केला असून आज मी कुटुंबासमोरच माझी तिरडी बांधली आहे, संचालक मंडळाकडून नाही तर माझी तिरडी निघेल , न्याय मिळणार नाही तोपर्यंत आमरन उपोषण सुरु राहील असा इशारा बाळासाहेब भिसे यांनी दिला.

# चऱ्होली येथील प्रिझम इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये ७५ वा प्रजासत्ताक दिन साजरा

**चिंचवड :** मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक संस्था व्दारा संचलित प्रिझम इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये ७५ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ह्या प्रसंगी प्रिझम स्कूलमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली होती. च-होली गांवचे कर्नल सुभाष मारुती तापकीर कार्यक्रमाचे मुख्य अतिथी होते. त्यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ह्या प्रसंगी तात्यासाहेब तापकीर पाटील, उल्हासराव काटे (लोकल बोर्डाचे सदस्य), रामदास दादा काळजे, गुलाबराव ताजणे, ॲड कुणाल तापकीर, अनिल तापकीर, सुनिल पठारे, सोनावणे, सिराजभाई मुलाणी



(मुस्लिम समाज अध्यक्ष), पोपट घारे, ह.भ.प.भानुदास तापकीर, ह.भ.प.डफळ महाराज, माजी ग्रामसदस्या अलकाताई पठारे, सौ. काटे सह विद्याथी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

सर्व प्रथम कर्नल सुभाष मारुती तापकीर ह्यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले, प्रिझम स्कुलच्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतुन सामाजिक ऐक्य, राष्ट्रीय एकात्मताचे प्रदर्शन करून उपस्थितांची वाहवा मिळविली. सांस्कृतिक कार्यक्रमानंतर, लेझीम, कराटे, योगासनांची प्रात्यक्षिक सादर करण्यात आली. योगशिक्षिकांनी ध्यान धारणा, योगा व्दारे आपले आरोग्य व मानसिकता कशी स्थिर ठेवता येते ते प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून पटून दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या संस्थापिका सुरैय्या शेख ह्यांनी केले. सुत्रसंचंलन महमंदशरीफ मुलाणी केले; आभार प्रदर्शन सिराजभाई मुलाणी केले. कार्यक्रमाचे संयोजक सिकंदर शेख व प्रिझम स्कूलचे शिक्षक व शिक्षकेत्तर कमर्चारी यांनी केले.

# विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेची कास अंगिकारून अतिउत्तम शिक्षण आत्मसात करा : उद्योगपती डॉ. देवेंद्र बोरा



**चिंचवड :** चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटचे प्रतिभा इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड कॉम्प्युटर स्टडीज, प्रतिभा ज्युनिअर कॉलेज, प्रतिभा इंटरनॅशनल स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज (सी.बी.एस.ई.) व प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 75 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहन उद्योगपती डॉ. देवेंद्र बोरा यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे व्यवसायिक डिंपक शहा, संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दिपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, प्राचार्य डॉ.ए.के. वाळुंज, प्राचार्या डॉ. पोणिर्मा कदम, उपप्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी, डॉ. वनिता कुऱ्हाडे, मुख्य प्रशासकिय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरीया, एम.बी.ए. विभागाचे संचालक डॉ. सचिन बोरगावे, मुख्याध्यापिका सविता ट्रॅव्हीस यांना माजी सैनिक रमेश वर्‍हाडे यांच्या मार्गदशर्नाखाली सुमारे 120 हून अधिक विद्यार्थ्यांनी वेशभूषा परिधान करीत उत्कृष्ट बँड पथका समवेत पथ संचलन करीत उपस्थितांना मानवंदना दिली. त्यावेळी सगळा परिसर टाळ्यांच्या गजरात दुमदुमून गेला. यावेळी पालक, विद्याथी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. देवेंद्र बोरा, डिंपल शहा यांच्या हस्ते गुणवंत प्राध्यापक, शिक्षक, खेळाडू, विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व भेटवस्तू देत सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, समुह नृत्य, मल्लखांब, राष्ट्रीय एकात्मतावर आधारित अनेकता मे एकता चे सादरीकरण उपस्थितांसमोर पारंपारिक वेशभूषा परिधान करून केले.

प्रमुख पाहुणे उद्योगपती डॉ. देवेंद्र बोरा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले, तुम्ही जे शिकता ते अतिउत्तम शिक्षण आत्मसात करा. जीवनाचे सार्थक करा. स्पर्धेच्या युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच कृतीला अनन्य साधारण महत्व आहे. यासाठी वेळेचे अचूक नियोजन करीत ध्येय निश्चितीच्या दिशेने जाण्याच्या प्रयत्न करा, लक्षात ठेवा. आजचे जे कर्तव्य आहे त्याची अंमलबजावणी तत्काळ करा. जे-जे सर्वोत्तम व गुणवत्तापूर्ण आहे ते साध्य करण्याची विचारधारा स्वतःच आत्मसात करण्याचा दृढ निश्चय करा. तुमची देहबोली सजग ठेवत आजूबाजुला काय घडत आहे हे समजून घेवून स्वतःमध्ये कृतीरूपी बदल घडवून आणा.

उद्योजक डिंपल शहा म्हणाले, काही विद्याथी उत्तम शिक्षण घेवून परदेशी जात होते. आज भारत देश सर्वच क्षेत्रात उत्तुंग यश मिळवत आहे. देशाबाहेर गेलेले विविध क्षेत्रातील तरूण देखील परत मायदेशी येवून आपल्या क्षेत्रात प्राविण्य मिळवित आहे, ही अभिमानास्पद बाब आहे.

संस्थेचे संस्थापक डॉ. दिपक शहा प्रास्ताविकात म्हणाले, आपण 26 जानेवारी साजरा करतो, परंतु, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतरांनी भारतीयांना संविधान दिले, त्याचे पालन आपण किती करतो याचा प्रत्येकाने विचार करावा. नियमांचे पालन करावे, असे आवाहन करून भारतीय संस्कृती व परंपरेची जपणूक करीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मेळ घालून अत्याधुनिक राष्ट्र निर्माण करण्याचा केंद्र सरकारचा मनोदय अतुलनीय आहे. त्यासाठी मानवजातीच्या व बौद्धिक विकासासाठी सर्वांचे सामुदायिक योगदान महत्त्वाचे आहे, याची जाणीव प्रत्येकांनी ठेवावी असे आवाहन केले.

यावेळी संस्थेच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वैशाली देशपांडे, डॉ. रविंद्र निरगुडे यांनी केले. पाहुण्याचा परिचय डॉ. सुनिता पटनाईक, प्रा. जस्मीन फराज यांनी तर, आभार उपप्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांनी मानले. ध्यजारोहन ची व्यवस्था क्रिडा शिक्षक प्रा. शबाना शेख, डॉ. रविंद्र लुंकड, प्रा. पी.टी. इंगळे, प्रा. अक्षय परदेशी यांनी केले.

# भगवंताचे चिंतन करा व संघटित रहा

## हभप श्रीनिवास महाराज घुगे आळंदीकर




**देहुगांव :** ।। ज्ञानराज माझी योगाची माऊली ।। जेणे निगमवल्ली प्रगट केली ।।

ऐश्वर्या संपन्न राष्ट्रसंत भगवान बाबा व संत वामनभाऊ महाराज यांच्या संयुक्त पुण्यतिथी निमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह दि२६ रोजी पासुन प्रारंभ झाला असून बल्लाळेश्वर हाउसिंग सोसायटी रुपीनगर तळवडे या ठिकाणी होत आहे

या सप्ताहमध्ये दि२६ पासून ३फेब्रुवारी पर्यंत यामध्ये पहाटे चार ते सहा काकडा सकाळी दहा ते बारा गाथा भजन दुपारी एक ते चार भजन सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ रात्री आठ ते दहा कीर्तन २६ जानेवारी ह भ प भागवताचार्य श्रीनिवास महाराज घुगे आळंदी देवाची यांचे ८ ते १० हरिकीर्तन करण्यात आले या कीतर्नामध्ये ह भ प श्रीनिवास महाराज यांनी प्रतिपादन ऐश्वर्या संपन्न राष्ट्रसंत भगवान बाबा व संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्तान हरिनाम सप्ताह मागील ९ वर्षापासून करत आहे चांगली गोष्ट आहे परंतु भगवान बाबाचे विचार घेऊन ज्याच्याकडे भगवंताचे चिंतन आहे त्याला चिंता नाही म्हणून भगवंताचे चिंतन करा ,संपत्ती सुविधा देते परंतु समाधान मिळत नाही समाधान मिळण्याकरता भगवंताचे नामस्मरण चिंतन करा व एकजुटीने रहा संघटित रहा असे सुद्धा सांगितले

दि ३ ह भ प गणेश महाराज शास्त्री श्रीक्षेत्रभगवानगड यांचे सकाळी दहा ते बारा काल्याचे किर्तन होईल दुपारी बारा ते पाच महाप्रसाद होईल. या सप्ताह मध्ये सर्व भावी भक्तांनी सहभाग घ्यावा आनंद घ्यावा असे जय भगवान युवा फाउंडेशनचे वतिने आमंत्रित केले आहे केले आहे

## वसंत बाबर यांना 'राष्ट्रपती पदक'

# पोलिस आयुक्तालयात एकाच अधिकाऱ्यास मिळाला सन्मान

**देहुगांव :** जवळ असलेले महाळुगें एमआयडीसी पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत बाबर कार्यरत असून त्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलिसांना विविध पदके जाहीर करण्यात आली. यात पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत कार्यरत असलेले वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत बाबर

सोलापूर जिल्ह्याच्या सांगोला तालुक्यातील चोपडी हे मूळगाव असलेले वसंत बाबर यांनी राहुरी विद्यापीठातून एम.एस्सी. ॲग्री केले आहे. डिसेंबर १९९६ मध्ये उपनिरीक्षक म्हणून पोलिस दलात दाखल झाले. ३ जून २०१४ रोजी पोलिस निरीक्षकपदी बढती झाली. मुंबई, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे ग्रामीण व सध्या पिंपरी -चिंचवड पोलिस दलामध्ये कर्तव्य बजावत आहेत. आर्थिक गुन्हे शाखा, विशेष शाखा, लाचलुचपत प्रतिबंधक विभागात त्यांनी सेवा केली. सेवा कालावधीमध्ये खूनप्रकरणी दाखल असलेल्या संवेदनशील सहा गुन्ह्यांची उकल केली. तसेच दरोडे, जबरी चोरी, घरफोडी चोरी व इतर मालमत्तेच्या चोरीच्या गुन्ह्यांची उकल केलेली आहे. बलात्कारप्रकरणी दाखल तीन गुन्ह्यांतील संशयितांविरुद्ध उत्कृष्ट



तपास करून दोषारोप दाखल केल्यानंतर सुनावणी दरम्यान संशयितांना शिक्षा झाली. नुकतेच घरफोडी चोरी करणाऱ्या अट्टल चोरट्यास अटक करून १८ घरफोडी चोरीतील एक किलो सोन्याचे दागिने जप्त करण्याची कामगिरी केली. या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्यांना २०२४ चा गुणवत्तापूर्ण सेवेसाठीचे राष्टपती पदक जाहीर करण्यात आले.

**सेवाकाळात ३५१ बक्षिसे, २३ प्रशस्तिपत्रे**

वसंत बाबर यांना सेवा कालावधीत आत्तापर्यंत ३५१ बक्षिसे व २३ प्रशस्तीपत्रक प्राप्त झाले आहेत. २०१४ मध्ये सेवा कालावधीतील गुणवत्तापूर्ण सेवेसाठी महाराष्ट राज्याचे ₹पोलिस महासंचालक पदक₹ देऊन गौरवण्यात आले. तसेच उत्कृष्ट कामगिरीबद्दल पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या हस्ते देखील बाबर यांना सन्मानित करण्यात आले आहे.

# सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांना कर्तव्य दक्ष अधिकारी पुरस्कार प्रदान



**मनोहर हिंगणे**

**ओतूर :** अणे माळशेज पट्ट्यातील ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतील ४७ गावागावात आपल्या कर्तव्य दक्षतेचा ठसा उमटविणाऱ्या ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांचा ओतूर ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

एक कर्तव्यदक्ष अधिकारी आणि गोरगरीब नागरिकांचा आधार म्हणून त्यांनी परिसरात उभे केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे भावनेने ग्रामस्थानी या सत्काराचे आयोजन केले होते.

सचिन कांडगे यांनी ओतूर पोलीस स्टेशन येथे सेवा देत असताना आलेल्या छोट्या मोठ्या असंख्य वाद विवादाच्या तक्रारीचे फिर्यादी व आरोपी यांचेशी संवाद साधून योग्य ते समुपदेशन करीत तक्रारींचे निराकरण करून गावागावात शांतता व सुव्यवस्था राखण्याकामी जाणीवपूर्वक विशेष प्रयत्न केले आहेत.परस्पर तक्रारींचे निवारण करून न्यायालयापर्यंत जाण्यापासून नागरिकांना रोखले तर आहेच त्याशिवाय महामार्गावरील अपघात टाळण्यासाठी रस्त्याचे खड्डे बुजविने व गतिरोधक निमितीसाठी विशेष प्रयत्न तथा नशाबाज वाहन चालकांना प्रसंगी तपासणी करून चपराक देत आपघातांचे प्रमाण रोखण्यात यश मिळविले आहे.

यावेळी सत्कारास उत्तर देताना एपीआय कांडगे म्हणाले की, पोलीस खात्यात कार्यरत असताना नियमाप्रमाणे बदल्या होतच असतात नवीन कामाच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर आपली शिस्त इतरांना लावणे सोपे नसते. सर्वांना विश्वासात घेऊन काम करण्याची आपली पद्धत असून त्यामुळे गुन्ह्यांची उकल होणे अधिक सोपे होते. विविध ठिकाणी कार्यरत असताना मिळालेली शाब्बासकीची थाप आपणास नेहमीच कर्तव्याची जाणीव करून देते. या जाणीवनेतूनच अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते असे ते म्हणाले.

पोलीस सेवेत कार्यरत असताना आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या जाणिवेतून उन्हाळ्यात पाणी टंचाई असलेल्या आदिवासी गावांमध्ये स्वखर्चाने पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करून आदिवासींची तहान भागविली आहे,एक गाव एक गणपती या मोहिमेला चालना मिळण्यासाठी गावाला श्री गणेश मूती सप्रेम भेट देणे,शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना भेट देऊन कायदे पालन व गुन्हेगारी याविषयी मार्गदर्शन, बस स्थानकातील वृद्ध प्रवासी व विद्याथिनी आणि महिला यांना प्रवास करताना घ्यावयाची काळजी व स्वसुरक्षितता या विषयी माहिती देणे, मोबाईल वापरताना घ्यावयाची काळजी अशा एक ना अनेक मार्गाने नागरिकांच्या सुरक्षिततेकामी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.त्यांच्या या कार्याची दखल घेत ओतूर ग्रामस्थानी त्यांना कर्तव्यदक्ष अधिकारी पुरस्काराचा सन्मान देत सत्काराचे आयोजन केले होते.

या प्रसंगी उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हा समन्वयक संभाजी तांबे,राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जुन्नर तालुका अध्यक्ष तुषार थोरात, मनसेचे तालुका अध्यक्ष तानाजी तांबे,उद्योजक जालिंदर पानसरे,उपसरपंच प्रशांत डुंबरे, भगवान घोलप, धोंडीभाऊ पानसरे, जयसिंग तांबे,किराणा असोशीएशनचे अध्यक्ष नितीन पन्हाळे,झांबर जाधव ,राजू भोर,प्रांजल भाटे,बाळासाहेब घुले,दत्तात्रय डुंबरे,रामदास तांबे,सुनील डुंबरे या मान्यवरांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# राज्य सरकारच्या निणर्यानंतर पुण्यात जल्लोष

पुणे : मराठा आरक्षणाबाबत मनोज जरांगे यांच्या मागण्यांबाबत राज्य सरकारने मांडलेल्या भूमिकेनंतर पुण्यात काही ठिकाणी जल्लोष करण्यात आला, तर काही ठिकाणी शांतता असल्याचे दिसून आले.

मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने शुक्रवारी सायंकाळपासून मोठ्या घडामोडींना सुरुवात झाली. राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर रातोरात मराठा आरक्षणाबाबतची राज्य सरकारची भूमिका राजपत्राद्वारे स्पष्ट करण्यात आली. त्यानंतर जरांगे पाटील यांनी उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला.

या पाश्वर्भूमीवर वाघोली येथे सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी सकाळीच गुलालाची उधळण करून मोठा जल्लोष साजरा केला. त्यात महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ सकाळीच ध्वनिवर्धक लावून कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण केली, फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. एक मराठा लाख मराठा, छत्रपती श्री शिवाजी महाराजा की जय, श्री सभाजी महाराज की जय च्या घोषणा देण्यात आल्या. तर शहराच्या मध्यवती भागात जल्लोषाचे वातावरण दिसून आले नाही.

